# महिला तक्रार निवारण समिती अहवाल २०१८-१९

शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयस्तरावर महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली. सदर समिती सदस्य म्हणून डॉ. गीता पाटील, श्रीमती कंचन दमाडे, श्री. विजय बडगुजर, श्री. नामदेव बडगुजर, कु. पुजा पाटील व डॉ. वंदना नंदवे यांचा समावेश होता. समितीची पहिली सभा दि. १०/०७/२०१८ रोजी घेण्यात आली. या सभेत समितीची कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली. यात मुख्यपणे विद्यार्थ्यांच्या तक्रारींची नोंद ठेवणे व प्राप्त तक्रारी सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे याबाबत चर्चा करण्यात आली.

दि. १६/०९/२०१८ रोजी समितीची द्वितीय सभा घेण्यात आली. या सभेत तक्रारीचा कोणताही अर्ज नसल्याने इतर बाबींवर चर्चा करण्यात आली. त्यात फलक तयार करणे, त्यावर कायद्यातील तरतुदी व महत्वाच्या सूचनांचा समावेश करण्यात यावा असे ठरले. ऑक्टोंबर महिन्यापासून युवतींसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिल्यामुळे महिला तक्रारींचे प्रमाण घडलेले नाही.

दि. २४/०९/२०१८ रोजी एका विद्यार्थिनीचा तक्रार अर्ज प्राप्त झाल्याने दि. २६/०९/२०१८ रोजी तातडीची सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत तक्रारकर्ता विद्यार्थिनी व ज्या बाबत तक्रार आहे तो विद्यार्थी यांना समितीसमोर बोलविण्यात आले. सदर प्रकार हा गैर समजाने झालेला असल्याचे लक्षात आल्यानंतर सदर विद्यार्थ्याला समज देऊन सदर प्रकरण निकाली काढण्यात आले. सर्व समिती सदस्यांनी वर्षभर मोलाचे सहकार्य दिले. त्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार.

डॉ.कामिनी तिवारी

प्रमुख

महिला तक्रार निवारण समिती